लोकमत सातारा, गुरुवार, दि. २८ नोव्हेंबर २०१३ २

# इपिलेस्पी शिबिरात १,२५० रुग्णांची तपासणी

कऱ्हाड : महाराष्ट्र शासनाच्या वतीने इपिलेस्पी फाउंडेशन मुंबई व राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने इपिलेप्सी (फीट येणे, झटके येणे) रुग्णांसाठी मोफत तपासणी व उपचार शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात एकूण १,२५० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन आमदार बाळासाहेब पाटील, आनंदराव पाटील, सभापती देवराज पाटील, धैर्यशील कदम, अशोक पाटील, डॉ. निर्मलकुमार सूर्या व डॉ. सुरेश जगदाळे, डॉ. दिलीप माने यांच्या हस्ते झाले.

या शिबिरात सातारा जिल्ह्यातील १,२५० रुग्णांची तपासणी मुंबई, पुणे, सोलापूर येथील इपिलेप्सी फाउंडेशनचे १७ न्युरॉलॉजिस्ट व त्यांचे पथकाकडून तपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांच्या मेंदूचा आलेख, सीटी स्कॅन व एमआरआय व वेगवेगळ्या रक्ताच्या चाचण्या करण्यात आल्या. त्यानंतर सर्वांना मोफत औषधोपचार देण्यात आला. या शिबिरासाठी जिल्ह्यातील सर्व प्रा. आ. केंद्र ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये व जिल्हा रुग्णालय येथील वैद्यकीय अधिकारी व रुग्णालयीन कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणावर रुग्ण उपचारासाठी आणले. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. प्रकाश शिंदे, सदाशिव जगदाळे, उज्ज्वला माने आदींनी प्रयत्न केले. (प्रतिनिधी)

माणिक डोंगरे

## रस्त्याची दुरवस्था

कऱ्हाड : कालेटेक ते काले रस्त्याच मोठी दुरवस्था झाली आहे. गेल अनेक वर्षांपासून दोन किलोमी अंतराच्या या रस्त्याच्या दुरुस्तीक प्रशासन व बांधकाम विभागाकड दुर्लक्ष केले जात आहे.

या रस्त्यावर यापूर्वी अनेक लहा मोठे अपघात झाले आहेत. गेल महिन्यात याठिकाणी झालेल्या ए मोठ्या अपघातात दुचाकीस्वार प्राण गमवावे लागले होते. रस्त्या असलेल्या धोकादायक वळणा येथील अपघाताचे प्रमाण वाढले अ याबाबत वाहनधारक त परिसरातील ग्रामस्थांनी अनेकव बांधकाम विभागाकडे तक्रार करु त्याची दखल घेतली जात ना रस्त्याची त्वरित दुरुस्ती करण यावी, अशी मागणी होत (प्रतिनिधी)

लोकसत्ता पुणे, सोमवार, १५ जून २०१५ ५

# औंध रुग्णालयात 'रीजनल एपिलेप्सी क्लिनिक'

## मिरगी येण्यावर मोफत औषधोपचार

प्रतिनिधी, पुणे

**औंधच्या** जिल्हा रुग्णालयात 'रीजनल एपिलेप्सी क्लिनिक' सुरू करण्यात आले असून या क्लिनिकमध्ये आठवड्यातून दोन वेळा पुण्यातील मेंदूविकारतज्ज्ञ सेवा देणार आहेत. पुण्यासह सातारा, आणि सोलापूरमधून येणाऱ्या रुग्णांनाही या क्लिनिकचा लाभ होणार आहे.

राज्याच्या आरोग्य विभागाचे संचालक डॉ. सतीश पवार यांच्या हस्ते रविवारी या क्लिनिकचे उद्घाटन करण्यात आले. पुणे न्यूरोलॉजिकल सोसायटीतर्फे चालवल्या जाणाऱ्या या क्लिनिकमध्ये रुग्णांना एपिलेप्सीवर (मिरगी येणे) मोफत औषधोपचार उपलब्ध होतील. या क्लिनिकसंबंधी अधिक माहितीसाठी ०२०-२९७०००४१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. रविवारी रुग्णालयात एपिलेप्सीच्या रुग्णांसाठी तपासणी शिबिराचे तसेच शासकीय व खासगी वैद्यकीय व्यावसायिकांसाठी एपिलेप्सी कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले होते.

एपिलेप्सी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. निर्मल सूर्या यांनी या कार्यशाळेचे उद्घाटन केले. तपासणी शिबिरात ६५० एपिलेप्सी रुग्णांची तपासणी करण्यात आली, तसेच त्यांना मोफत औषधे पुरवण्यात आली.